# अँटनी आणि क्लीओपात्रा (Antony and Cleopatra)ः विल्यम शेक्सपियर

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

प्रास्ताविकः

पॉंपी, ज्यूलियस सीझर, आणि नंतर मार्क अँटनी अशा रणधुरंधर वीरांना आपल्या अनुपम सौंदर्याने भुरळ पाडणारी इजिप्तची राणी क्लीओपात्रा ही एक जगप्रसिद्ध सौंदर्यसम्राज्ञी होती. ’नाइलची नागीण’ (Serpent of the Nile) या अँटनीच्या संबोधनाला साजेसे तिचे सौंदर्य जहाल, मादक, रसरशीत, व पुरूषांना घायाळ करणारे होते. या तीन वीरपुरूषांपैकी एकटा अँटनीच तिच्या खऱ्या प्रेमाचा भाग्यवान प्रियकर ठरला. त्याच्या मृत्यूनंतर तिनेही त्याच्यासाठी आत्मबलिदान केले.

हॉलिवुडच्या सर्वात अधिक खर्चिक (सुमारे ६ कोटी डॉलर्स) क्लीओपात्रा नावाच्या चित्रपटात क्लीओपात्राची भूमिका करणारी अभिनेत्री एलिझाबेथ टेलर ही क्लीओपात्रासारखीच चिरतरूण सुंदर स्त्री होती. तिचे वैयक्तिक जीवनही क्लीओपात्रासारखे स्वैर, रंगेल होते. तिने एकंदर ८ लग्ने केली, त्यातील दोन आपल्याच घटस्फोटित पतींशी केली. वयाच्या ६५ व्या वर्षीही तरूणांना भुरळ पडेल इतकी ती मादक सौंदर्यवती होती. क्लीओपात्रा सिनेमातील तिचा प्रमुख ड्रेस १० लाख डॉलर्सचा रत्नखचित होता आणि तिचा हॉलिवुडमधील ४५ खोल्यांचा प्रशस्त प्रासाद ही एक प्रेक्षणीय वास्तु होती. बऱ्याच जणांना १९६० च्या सुमारास पुण्यात प्रदर्शित झालेला क्लीओपात्रा सिनेमा नक्कीच आठवत असेल. हा सिनेमा, हॉलिवुडमधील तिचे निवासस्थान, व तिचा ६५ वा वाढदिवस या तिच्यासंबंधीच्या काही आठवणी अजूनही माझ्या मनात ताज्या आहेत. २०११ च्या मे महिन्यात ’लिझ टेलर’ कालवश झाली.

जेथे ’ज्यूलियस सीझर’ नाटक संपते तेथेच ’अँटनी आणि क्लीओपात्रा’ सुरू होते -- इजिप्तच्या त्या वेळच्या अलेक्झांड्रिया नावाच्या राजधानीत, क्लीओपात्राच्या महालात. हे नाटकही एक रोमन शोकांतिका आहे.

प्रमुख पात्रेः

| | |
|---|---|
| ऑक्टेव्हियस सीझरः | ज्यूलियस सीझरचा तरूण पुतण्या, त्याच्या साम्राज्याचा १/३ वाटेकरी. |
| मार्क अँटनीः | ज्यूलियसचा एकनिष्ठ सेनानी, त्याच्या साम्राज्याचा १/३ वाटेकरी. |
| क्लीओपात्राः | इजिप्तची सुंदर महत्वाकांक्षी राणी |
| फुल्वियाः | अँटनीची पहिली पत्नी |
| ऑक्टेव्हियाः | अँटनीची दुसरी पत्नी, ऑक्टेव्हियसची बहीण |

कथानकः

इजिप्तवर स्वारी करून त्या देशाची  राणी क्लीओपात्रा हिला बंदिवान करून रोमला आणावे या ऑक्टेव्हियस सीझरच्या आदेशानुसार अँटनी अलेक्झांड्रिया या इजिप्तच्या राजधानीत दाखल होतो.

क्लीओपात्रा युद्ध करण्याऐवजी त्याच्यावर आपल्या मोहक सौंदर्याचे जाळे पसरते व त्यात तो बंदिवान होऊन भोगजीवनात रममाण होतो. बरेच दिवस जातात; क्लीओपात्रा अतिशय हुशारीने कधी रूसवा तर कधी लडिवाळपणा दाखवत, कधी त्याच्या पराक्रमाला डिवचत तर कधी त्याच्या पत्नीच्या प्रेमाबद्दल टोमणे मारत, तो आपल्या प्रेमाच्या पंजात कायम राहील याची दक्षता घेते. प्रेयसीच्या या सर्व चाळयांत ती तरबेज असते. त्यामुळे अँटनीच्या एका सहकाऱ्याच्या शब्दात 'क्लीओपात्राने जगाच्या साम्राज्याचा तिसरा स्वामी असलेला अँटनी याला एक लंपट गुलाम बनवलेला असतो [The triple pillar of the world transform'd into a strumpet's fool]. रोमहून एखादा दूत आला की ती 'बहुतेक सीझरने हा देश जिंक, तो देश काबीज कर अशी कामगिरी सोपवली असेल किंवा फुल्वियाने [अँटनीची पत्नी] काहीतरी बहाणा काढून रोमला तांतडीने बोलावले असेल' अशी त्याची टिंगल करीत असे. तो तिच्यापासून थोडा जरी दूर गेला तरी लगेच दूत पाठवून 'तो उदास असेल तर मी आनंदात नाचते आहे असे सांग आणि तो आनंदात असेल तर मी खिन्न होऊन त्याची वाट पाहते आहे असे सांग' असा निरोप देत असे. तिच्या या उंदिर-मांजराच्या खेळामुळे अँटनीची अवस्था 'धरावे तर चावते, सोडावे तर पळते' अशी झाली होती. प्रेमाच्या खेळात क्लीओपात्रा इतकी तरबेज होती की अँटनी तिच्या 'ताटाखालचं मांजर' झाला होता.

एके दिवशी रोमचा दूत बातमी घेऊन येतो, 'फुल्विया मरण पावली आहे, व सम्राट पाँपीच्या मुलाने अँटनी इजिप्तमध्ये गुंतला आहे या गोष्टीचा फायदा घेऊन रोमच्या दिशेने आक्रमण सुरू केले आहे.' स्वतःची इभ्रत व साम्राज्य सांभाळण्यासाठी अँटनीला तांतडीने इजिप्त सोडावे लागते.

रोममध्ये ऑक्टेव्हियस व अँटनी आपले मतभेद मिटवून एकत्र येतात; अँटनी पाँपीचे आक्रमण परतवून लावतो. ऑक्टेव्हियस हा तरूण व महत्वाकांक्षी असतो. अँटनीच्या पराक्रमाबद्दल त्याला आदर असतो पण अँटनीचे रंगेल, छंदीफंदी वागणे त्याला पसंत नसते. ऑक्टेव्हियस आपली बहीण ऑक्टेव्हिया हिचे अँटनीशी लग्न करण्याचा प्रस्ताव पुढे करतो व अँटनी दोघांमधील बेबनाव मिटवण्यासाठी तो प्रस्ताव मान्य करतो. लग्न होते आणि पत्नीसह अँटनी आपल्या स्वामित्वाखालील ग्रीसची राजधानी अथेन्स येथे जातो. इकडे ऑक्टेव्हियस 'पाँपीला गुप्तपणे मदत केली' असा आरोप करून त्यांचा तिसरा पार्टनर लेपिडस याला कौन्सिलवरून काढतो व रोमन साम्राज्याचा त्याचा वाटा स्वतःच्या ताब्यात घेतो. या संधीचा फायदा घेऊन क्लीओपात्रासाठी अधीर झालेला अँटनी ऑक्टेव्हियाला रोमकडे पाठवून देतो व स्वतः अलेक्झांड्रियाला परत येतो. त्याचा आणि क्लीओपात्राचा रोमान्स परत सुरू होतो. ऑक्टेव्हियस आणि अँटनी यांचे आता उघड वैर सुरू होते. मोठी फौज घेऊन सीझर इजिप्तवर चालून येतो. जमिनीवरील युद्धात अँटनी हा अजिंक्य असतो त्यामुळे सीझर त्याला भूमध्य समुद्रातील आरमारी युद्धात गुंतवतो. सुरूवातीस क्लीओपात्रा आपले आरमार अँटनीच्या मदतीला पाठवते, पण ऐन रणधुमाळीत ती आपले सैन्य मागे घेते. प्रेमवेडा अँटनीही युद्ध सोडून तिच्या पाठोपाठ परत येतो. एका रंगेल स्त्रीसाठी आपला लौकिक धुळीत मिळवणाऱ्या अँटनीवर त्याचे सहकारी सेनानी नाराज होतात व त्याला सोडून सीझरला जाऊन मिळतात. राजवाड्यात परत आलेल्या नाराज अँटनीची क्लीओपात्रा मामूली खोटी कारणे

सांगून समजूत काढते. ती आपल्याला बनवते आहे हे लक्षात येऊनही अँटनी स्वतःला तिच्या मोहातून बाहेर काढू शकत नाही. शोकांतिकेला सुरूवात होते.

दरम्यान ऑक्टेव्हियस क्लीओपात्राकडे आपले दूत पाठवून 'अँटनीला त्याच्या ताब्यात सोपवल्यास तिला सन्माननीय वागणूक मिळेल व तिचे इजिप्तचे राणीपद अबाधित राहील' असे आश्वासन देतो; तीही त्याला एकनिष्ठेची ग्वाही देते. सीझरचे दूत तिला भेटत आहेत व ती त्यांचे स्वागत करत आहे हे पाहूनही अँटनी आपली तिच्याबद्दलची ओढ जराही आवरू शकत नाही. अँटनीची तहाची ऑफर ऑक्टेव्हियस फेटाळून लावतो. अँटनी  परत जोरदार तयारी करून युद्धात उतरतो. शर्थीने पराक्रम करून तो विजयाच्या जवळपास पोचतो. विजय समोर दिसत असतो आणि परत ऐनवेळी क्लीओपात्रा आपले सैन्य माघारी बोलवून त्याला तोंडघशी पाडते. विश्वासघाताने चिडलेला पराभूत अँटनी राजवाड्यात परत येतो. त्याचा रागाचा पारा कळताच क्लीओपात्रा 'त्याच्या प्रेमाखातर आपण आत्महत्या करत आहोत' असा निरोप त्याला पाठवते. क्लीओपात्राचा निरोप येताच सर्व विसरून अँटनी तिच्यासाठी शोक करू लागतो. तिच्या विरहाने प्रेमविव्हळ होऊन तो आपल्या छातीत तलवार खुपसून आत्मघाताचा प्रयत्न करतो. जखमांच्या वेदनामुळे तळमळत असताना ती जिवंत असल्याची वार्ता येते. सेवकांच्या साहाय्याने तो तिच्याजवळ पोचतो व तिच्या बाहुपाशात प्राण सोडतो. मरता मरता त्याने दिलेल्या इशाऱ्यामुळे - 'सीझर तिला मानाची वागणूक देणार नाही; तिची रोममध्ये धिंड काढून तिला गुलामासारखे वागवील' - ती सावध होते. अंगावर सम्राज्ञीचा भरजरी ड्रेस चढवून व सिंहासनावर बसून वक्षस्थळावर एक विषारी किडा ठेवून मानाचे मरण स्वीकारते.

अँटनी आणि क्लीओपात्राच्या निधनाची बातमी कळताच सीझरला खूप वाईट वाटते. जरी अँटनी बेजबाबदारपणे वागला असला तरी तो एक दिलदार शूर सेनानी व ज्यूलियस सीझरचा - त्याच्या काकाचा - परमप्रिय सहकारी होता. क्लीओपात्राने जरी अँटनीला झुलवले असले तरी शेवटी तिने त्याच अँटनीसाठी आत्मबलिदान केलेले असते. त्या दोघांच्या या प्रेमाला तो सलाम करतो व त्यांना मानवंदना म्हणून एकाच शवागारात दोघांचेही शाही इतमामात अंत्यविधी करण्याचे आदेश देतो.

अँटनी-क्लीओपात्राच्या प्रेमाला त्यांच्या मृत्यूमुळे एक झळाळी, उदात्तता मिळते आणि त्यांचे प्रेम अलौकिक ठरते.

'ज्यूलियस सीझर' प्रमाणे 'अँटनी आणि क्लीओपात्रा' एक रोमन शोकांकिका आहे.

०००००-----०००००

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com